# साप्ताहिक धुरी एक्सप्रेस






● वर्ष १ ● अंक १ ● ठाणे ● सोमवार, १४ ते रविवार, २० सप्टेंबर २०२६ ● किंमत २ रुपये


## विशेष संपादकीय

### नवचैतन्याची सुरुवात...

गणपती बाप्पा मोरया!

आज भाद्रपद शुक्ल चतुर्थी. विघ्नहर्त्या श्रीगणेशाच्या आगमनाने महाराष्ट्रातील घराघरांत आणि मनामनांत उत्साहाचे नवचैतन्य संचारले आहे. याच मंगलमय वातावरणात 'धुरी एक्सप्रेस' या साप्ताहिक ई-पेपरचा पहिला अंक आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. वृत्तपत्र सुरू करणे म्हणजे केवळ बातम्या छापणे नव्हे; तर समाजाच्या भावना, प्रश्न, अपेक्षा आणि बदलत्या वास्तवाला शब्द देण्याची जबाबदारी स्वीकारणे होय. हीच भूमिका घेऊन 'धुरी एक्सप्रेस' आपल्या वाचकांसमोर येत आहे. आज माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. मोबाइलच्या एका क्लिकवर जगभरातील बातम्या आपल्यापर्यंत पोहोचतात. मात्र या माहितीच्या गर्दीत आपल्या परिसरातील सामान्य माणसाचा आवाज अनेकदा हरवतो. गावातील एखादा चांगला उपक्रम, शेतकऱ्याची समस्या, विद्यार्थ्यांचे यश, महिलांचे कर्तृत्व, स्थानिक प्रशासनाचा प्रश्न किंवा समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तींची धडपड या गोष्टींनाही तितकेच महत्त्व मिळाले पाहिजे.

'धुरी एक्सप्रेस'ची धुरा याच विचारातून उचलली आहे

आम्ही कोणत्याही एका वर्गाचा, विचाराचा किंवा गटाचा आवाज बनण्याऐवजी सत्य, निष्पक्षता आणि लोकहित यांना केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न करू. बातमी प्रसिद्ध करण्यापूर्वी तिची खातरजमा, सर्व संबंधित बाजू ऐकून घेणे आणि वाचकांचा विश्वास जपणे याला आमचे सर्वोच्च प्राधान्य असेल. या साप्ताहिकात स्थानिक घडामोडींसोबत महाराष्ट्र, देश आणि जगातील महत्त्वाच्या घटनांचा वेध घेतला जाईल. शेती, शिक्षण, आरोग्य, रोजगार, पर्यावरण, उद्योग, क्रीडा, संस्कृती आणि सामाजिक प्रश्नांना योग्य स्थान देण्याचा आमचा प्रयत्न राहील. हे साप्ताहिक आमचे एकट्याचे नाही; ते आपल्या सर्वांचे आहे.

चांगले काम करणाऱ्यांचे कौतुक आणि चुकीच्या गोष्टींवर प्रश्न विचारण्याचे धैर्य या दोन्ही गोष्टी पत्रकारितेत आवश्यक आहेत. त्यामुळे 'धुरी एक्सप्रेस'च्या प्रवासात आपल्या सूचना, प्रतिक्रिया, बातम्या आणि सहकार्य यांचे नेहमीच स्वागत असेल. श्रीगणेशाच्या चरणी नतमस्तक होत आज आम्ही हा पहिला अंक आपल्या हाती सोपवत आहोत. हा केवळ एका साप्ताहिकाचा शुभारंभ नाही, तर आपल्या परिसरातील बातम्यांना, आपल्या प्रश्नांना आणि आपल्या आवाजाला एक व्यासपीठ देण्याचा संकल्प आहे.

चला, या नव्या प्रवासाची सुरुवात करूया.

आपल्या परिसरातील बातमी... आपल्या आवाजात!

-संपादक
धुरी एक्सप्रेस



**सेलिब्रिटी बाप्पा**
अनेक प्रसिद्ध मराठी कलाकारांनी आपापल्या घरी पर्यावरणपूरक बाप्पाचे स्वागत करून सुंदर फोटो शेअर केले आहेत. सुबोध भावे आणि अभिज्ञा भावे यांचा घरचा गणपती

# नवचैतन्याचा उत्सव! १२ दिवसांचा सोहळा

## जयघोषात विघ्नहर्त्याचे थाटात आगमन



**धुरी एक्सप्रेस वृत्तसंस्था**

**मुंबई-पुणे :** यंदाचा गणेशोत्सव अनेक अर्थांनी ऐतिहासिक आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. भाद्रपद शुक्ल चतुर्थीला, म्हणजेच १४ सप्टेंबर २०२६ रोजी अवघ्या महाराष्ट्रात गणपती बाप्पा मोर्या"च्या जयघोषात विघ्नहर्त्याचे थाटात आगमन झाले. यंदा हरितालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी आल्याने सणाचा आनंद द्विगुणित झाला आहे. पण यावर्षीच्या उत्सवाचे रंग केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून ते जागतिक स्तरावर पोहोचले आहेत.

२०१७ नंतर पहिल्यांदाच १२ दिवसांचा प्रदीर्घ उत्सव पंचांगातील तिथींच्या गणितामुळे यंदाचा उत्सव नेहमीप्रमाणे १० दिवसांचा नसून चक्क १२ दिवसांचा असणार आहे. प्रदीर्घ काळ बाप्पाचे वास्तव्य घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये राहणार असल्याने व्यापारी, फुलवाले, मिठाई विक्रेते आणि ढोल-ताशा पथकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. मध्यान्ह मुहूर्तावर (सकाळी ११:२० ते दुपारी १:४८) देशभरात कोट्यवधी भाविकांनी बाप्पाची साग्रसंगीत प्राणप्रतिष्ठापना केली.

**लालबागचा राजा**

मुंबईतील लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी नेहमीप्रमाणेच मैलोन्मैल रांगा लागल्या आहेत. चिंचपोकळीचा चिंतामणी आणि जीएसबी किंग्ज सर्कलच्या बाप्पाचे वैभव डोळे दिपवणारे आहे. लालबाग परिसरात सुरक्षेसाठी हजारो पोलीस आणि ड्रोन तैनात करण्यात आले आहेत.

**पुण्याची सांस्कृतिक परंपरा**

पुण्यात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसाठी वृंदावनच्या प्रेम मंदिरची १३५ फूट उंच हुबेहूब प्रतिकृती उभारण्यात आली आहे. तर कस्बा गणपती, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि केसरीवाडा या पाचही मानाच्या गणपतींची प्रतिष्ठापना पारंपरिक आणि शिस्तबद्ध मिरवणुकीने झाली.

**जपान ते सिंगापूर**

आंतरराष्ट्रीय स्तरावर घुमला बाप्पा"चा डंका महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या अधिकृत राज्यस्तरीय गणेशोत्सव स्पर्धेने यंदा सर्व रेकॉर्ड मोडले आहेत. एकूण ४३२ अधिकृत गणेश मंडळांनी यात सहभाग घेतला असून, ठाणे जिल्हा ५२ मंडळांसह राज्यात आघाडीवर आहे. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच जपान, जर्मनी, सिंगापूर आणि श्रीलंका या देशांतील अनिवासी भारतीयांच्या गणेश मंडळांनी या स्पर्धेत ऑनलाइन नोंदणी करून सहभाग घेतला आहे. आपला हा पारंपरिक सण आता खऱ्या अर्थाने ग्लोबल झाला आहे.

**पर्यावरणपूरक पाऊल**

यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणाचा संदेश केवळ भाषणांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो कृतीत आणला गेला आहे. लालबागच्या राजाच्या मंडपातून दररोज गोळा होणाऱ्या ८ ते १० मेट्रिक टन ओल्या कचऱ्यापासून (हार, फुले, प्रसादाचे अवशेष) थेट वीज निर्मिती केली जात आहे. मुंबई महानगरपालिकेने कृत्रिम तलावांची संख्या वाढवली असून विसर्जन सोपे व्हावे यासाठी मोफत क्रेनची सुविधा दिली आहे. ङ पेण (रायगड) येथून यंदा तब्बल १५ लाख शाडूच्या मूर्ती परदेशात निर्यात झाल्याने कोट्यवधींची उलाढाल झाली आहे.

**कोकणवासीयांची दिवाळी**

टोल फ्री प्रवासाने दिला दिलासा कोकणात जाणाऱ्या लाखो भाविकांसाठी राज्य सरकारने ११ ते २७ सप्टेंबर २०२६ या काळात मुंबई-गोवा महामार्ग, मुंबई-बेंगळुरू हायवे आणि अटल सेतूवर पूर्णपणे टोल माफी दिली आहे. मध्य रेल्वेने सोडलेल्या ३८६ विशेष गाड्यांमुळे वाहतुकीचा ताण कमी झाला असला, तरी पुढील दोन दिवस मुंबई आणि कोकण किनारपट्टीवर मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे, त्यामुळे प्रशासनाने भक्तांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

■ **पुण्यात २१ हजार पाणीपुरींचा गणपती:** पुण्याच्या फर्ग्युसन रोडवरील एका गणेश मंडळाने तब्बल २१,००० पाणीपुरींच्या पुऱ्यांचा वापर करून १३ फूट उंच बाप्पाची विलोभनीय मूर्ती साकारली आहे, जी सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे

■ **लालबागचा राजा २०२६:** मुंबईच्या लालबागच्या राजाचे मनमोहक रूप पाहण्यासाठी भाविकांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली आहे. मंडळाचे हे ९३ वे वर्ष आहे.

■ **श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती:** पुण्याच्या दगडूशेठ हलवाई गणपतीची प्राणप्रतिष्ठापना आज सकाळी ११:११ वाजता अत्यंत पवित्र वातावरणात संपन्न झाली असून बाप्पाचे थेट दर्शन घेण्यासाठी भाविक ऑनलाईन व ऑफलाईन गर्दी करत आहेत.

■ **GSB सेवा मंडळ (मुंबई):** मुंबईतील सर्वात श्रीमंत गणपती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या किंग्ज सर्कलच्या GSB सेवा मंडळाने यंदा ६६ किलो सोने आणि ३३५ किलो चांदीच्या दागिन्यांनी बाप्पाला सजवले असून मंडळाने तब्बल ७०३ कोटी रुपयांचे विमा संरक्षण घेतले आहे.

■ **राजकीय भेटी:** गणेशोत्सवाच्या निमित्ताने राजकीय वर्तुळातही हालचाली वाढल्या असून उद्धव ठाकरे यांनी सहकुटुंब राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी जाऊन बाप्पाचे दर्शन घेतले.






## मुंबईचा राजा (लालबाग सार्वजनिक उत्सव मंडळ, गणेश गल्ली)

मुंबईतील सर्वात जुन्या आणि प्रसिद्ध गणपतींपैकी एक. मंडळाची स्थापना १९२८ मध्ये झाली. असून हा गणेशोत्सव स्वातंत्र्यपूर्व काळापासून साजरा केला जात आहे. एका विसर्जनाच्या वेळी 'नवाकाळ' वृत्तपत्रात 'मुंबईचा राजा निघाला विसर्जनाला चौपाटीवर' असा मथळा प्रसिद्ध झाली होता. तेव्हापासून या बाप्पाला 'मुंबईचा राजा' म्हणून ओळखले जाऊ लागले. मुंबईचा राजा त्याच्या भव्य आणि सुंदर मूर्तीसाठी ओळखला जातो. १९७७ मध्ये या मंडळाने भारतात पहिल्यांदा २२ फूट उंच गणेशमूर्ती तयार करून जागतिक विक्रम केला. दरवर्षी येथे देशातील प्रसिद्ध मंदिरांची किंवा ऐतिहासिक घटनांची हुबेहूब प्रतिकृती (थीम) आरास म्हणून उभी केली जाते. ) हा गणपती लालबाग-परळ परिसरातील गणेश गल्लीत विराजमान होतो. उत्सव काळात बाप्पाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविक गर्दी करतात.



## गिरगावचा राजा

हा दक्षिण मुंबईतील अत्यंत लोकप्रिय, ऐतिहासिक आणि मानाचा गणपती आहे. निकदवारी लेन सार्वजनिक श्री गणेशोत्सव मंडळद्वारे या उत्सवाचे आयोजन केले जाते. या मंडळाची स्थापना १९२८ मध्ये झाली. यंदा २०२६ मध्ये हे मंडळ आपले ९९वे ऐतिहासिक वर्ष साजरे करत असून २०२७ मध्ये शतकमहोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहे. यंदा २०२६ मध्ये मंडळाने तब्बल २४ फूट उंच आणि ३.५ टन वजनाची शाडूच्या मातीची भव्य मूर्ती साकारली आहे, जी मुंबईतील सर्वात मोठी पर्यावरणपूरक मूर्ती मानली जाते. त्यांच्या या उपक्रमाचे कौतुक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मन की बात मध्येही केले आहे.



## गिरगावचा राजा

परळ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (किंवा परळ विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ) हे मुंबईतील गिरणगाव (परळ-लालबाग) परिसरातील अत्यंत जुने, मानाचे आणि प्रसिद्ध मंडळ आहे. या मंडळाच्या अंतर्गत प्रामुख्याने 'परळचा राजा' (नरे पार्क) आणि 'परळचा महाराजा' ही दोन प्रसिद्ध रूपे भाविकांचे लक्ष वेधून घेतात.परळ विभाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, नरे पार्क (परळचा राजा) या ऐतिहासिक मंडळाची स्थापना १९४७ मध्ये झाली. यंदा २०२६ मध्ये हे मंडळ आपले ८०वे वर्ष साजरे करत आहे. बाप्पाची विलोभनीय मूर्ती प्रसिद्ध मूर्तीकार निखिल विजय खातू यांच्या कार्यशाळेत साकारली जाते. बाप्पाचे तेजस्वी डोळे आणि शांत मुद्रा हे या मूर्तीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. यंदा २०२६ मध्ये बाप्पा वारकरी रूपात साक्षात विठ्ठलाच्या अवतारात विराजमान झाला आहे. 'यंदाची वारी... परळच्या राजाच्या दारी' अशी मंडळाची या वर्षीची संकल्पना असून, पंढरपूरहून आणलेले पवित्र विठ्ठल जल मंडळात खास तळे तयार करून ठेवण्यात आले आहे.

आपली बातमी...
आपल्या लोकांसाठी...

स्थानिक ते जागतिक
नेहमी एक पाऊल पुढे...

# धुरी एक्सप्रेस

डिजिटल मीडिया समूह

News
Media
Digital
People
Progress

बातमी | विश्लेषण | संवाद | विकासाच्या दिशेने | विश्वासार्ह | वेगवान | सर्वसमावेशक

## तुमच्या प्रसिद्धीसाठी विश्वासाचे माध्यम !

संस्था, व्यवसाय, उपक्रम आणि विचारांना व्यापक प्रमाणात पोहोचवण्यासाठी 'धुरी एक्सप्रेस' सदैव आपल्या सोबत !




मैत्री आणि विश्वास हेच आमचे ब्रीद !

## आम्ही करतो...

### डिजिटल प्रसिद्धी

- वेबसाईटवर बातम्या व माहिती अपलोड करणे
- ई-पेपर तयार करून अपलोड करणे
- सोशल मिडिया प्रसिद्धी व प्रचार
- डिजिटल न्युज व कंटेंट निर्मिती
- संस्था, व्यवसाय व उपक्रमांची ऑनलाईन प्रसिद्धी

### नियतकालिके

- दैनिक
- साप्ताहिक
- पाक्षिक
- मासिक
- त्रैमासिक
- सहामाही
- वार्षिक

### ई-पेपर व लेंआउट सेवा

- ब्रॉडशीट, टॅब्लॉईड स्वरूपातील ई-पेपर सादरीकरण
- फुल-पेज डिजिटल प्रसिद्धी
- बातम्या, जाहिराती व विशेषांकांचे ई-पेपरमध्ये सादरीकरण
- ई-पेपर वेबसाईटवर अपलोड करण्याची सुविधा
- आकर्षक व व्यावसायिक पानमांडणी

### इतर सेवा

- बातमी लेखन व संपादन
- भाषांतर सेवा
- डिजिटल डिझाईन व लेआउट
- फोटो व व्हिडिओ क्व्हरेज
- सोशल मीडिया व्यवस्थापन
- विशेष प्रकल्प व मोहीम प्रसिद्धी
- जाहिरात नियोजन व सल्ला

### ग्राहकाचा संतोष हेच आमचे समाधान !

विश्वास, दर्जेदार सेवा आणि प्रभावी डिजिटल प्रसिद्धीच्या माध्यमातून **'धुरी एक्सप्रेस'**चा प्रवास सुरू आहे.

आम्ही तुमच्यासोबत आहोतच; आपणही आमच्यासोबत राहून या प्रवासाचा आनंद द्विगुणित करा !

'धुरी एक्सप्रेस' ला Like | Share | Subscribe | Follow करा !

YouTube @dhuriexpress123
Facebook DhuriExpress123
X (Twitter) dhuriexpress123
Instagram dhuriexpress123
Telegram dhuriexpress123
ई-मेल : dhuriexpress123@gmail.com

चला... नव्या शक्यतांकडे !

बातमीपेक्षा अधिक... समाजासाठी, विकासासाठी !

वेबसाईट | समाजाशी जोडणारे | विकासाला चालना देणारे | सकारात्मक बदल घडवणारे

**धुरी एक्सप्रेस**

आपल्या प्रसिद्धीचे विश्वासाचे डिजिटल माध्यम



## ६०० वर्षांची परंपरा

# एक गाव, एक गणपती!

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील कोईळ गावाला सुमारे ६०० वर्षांची ऐतिहासिक आणि सांस्कृतिक परंपरा लाभली आहे. या गावात गेल्या सहाशे वर्षांपासून 'एक गाव, एक गणपती' ही अनोखी परंपरा जपली जात आहे. गणेश चतुर्थीच्या काळात गावातील कोणत्याही घरात गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केली जात नाही. संपूर्ण गावासाठी एकच गणपती असून, मंदिरातच एकत्रितपणे गणेशोत्सव साजरा केला जातो.

तळकोकणात गणेशोत्सव म्हटले की प्रत्येक घरात लाडक्या बाप्पाचे आगमन होते. मात्र, कोईळ गाव याला अपवाद आहे. गावातील गणपती मंदिरात असलेल्या काळ्या पाषाणातील गणेशमूर्तीची गणेश चतुर्थीच्या काळात आकर्षक सजावट केली जाते. संपूर्ण गाव एकत्र येऊन भक्तिभावाने गणेशोत्सव साजरा करते. ही परंपरा अनेक पिढ्यांपासून अखंडपणे सुरू असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

गणेशोत्सवासाठी कामानिमित्त मुंबईसह इतर शहरांमध्ये आणि परगावी असलेले कोकणवासीय आवर्जून गावात दाखल होतात. कोईळ गावात सुमारे ८० ते ९० घरे असून, ३०० ते ३५० लोकवस्ती आहे. गणेशोत्सवाच्या काळात संपूर्ण गाव एकत्र येते आणि गुण्यागोविंदाने उत्सव साजरा केला जातो. उत्सवाच्या तयारीसाठी सर्वप्रथम संपूर्ण गावातून शिधा गोळा केला जातो. याच शिध्यातून गणेश चतुर्थीच्या काळात भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था केली जाते. गणेशोत्सवाच्या ११ दिवसांच्या काळात घरांमध्ये गणेशमूर्ती किंवा गणेशाची प्रतिमा ठेवली जात नाही. सत्यनारायणाची पूजा किंवा अन्य धार्मिक विधीही घरात न करता मंदिरातच केले जातात. त्यामुळे संपूर्ण गावात ११ दिवस भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते.

### 'गणपतीला मानत नाही' हा गैरसमज दूर करा

कोईळ गावातील आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील कुटुंबांच्या लग्नपत्रिकांवर गणपतीचे चित्र छापले जात नाही. त्यामुळे काही जणांचा गैरसमज होतो की, गावकरी गणपतीला मानत नाहीत. मात्र, ग्रामस्थांच्या मते, ही गणरायाविषयीची अनास्था नसून श्रद्धेचा आणि पावित्र्य जपण्याचा भाग आहे. 'गणरायाला विघ्नहर्ता म्हणून लौकिक आहे. त्याची कुठेही विटंबना होऊ नये आणि त्याचे पावित्र्य जपले गेले पाहिजे,' अशी भावना स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करतात.

### नव्या पिढीनेही जपली परंपरा

गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेली 'एक गाव, एक गणपती"ची परंपरा आजच्या युवा पिढीनेही तितक्याच श्रद्धेने पुढे नेली आहे. मागील पिढ्यांनी ज्या पद्धतीने ही परंपरा जपली, त्याच पावलावर पाऊल ठेवून ती कायमस्वरूपी जोपासण्याचा निर्धार युवा पिढीने केला आहे. 'घरगुती गणपतीपेक्षा संपूर्ण गावाने एकत्र येऊन सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्यात आम्हाला अधिक आनंद मिळतो,' अशी भावना स्थानिक ग्रामस्थ व्यक्त करतात.

### मात्र विकासापासून गाव दूर

एकीकडे ६०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा जपणाऱ्या कोईळ गावाला मात्र आजही मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. गावात जाण्यासाठी अद्यापही चांगला रस्ता उपलब्ध नाही. मे महिन्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई ही गावकऱ्यांसमोरील मोठी समस्या ठरते. ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या कोईळ गावाकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाने लक्ष देऊन रस्ता, पाणी तसेच अन्य मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## घराघरांत बाप्पाचा जल्लोष

# 'नवं सोहळ्या'तून जपली जाते शेतीची परंपरा!



**कुडाळ** तालुक्यातील सोनवडे आणि सरंबळ या दोन्ही गावांत गणेशोत्सव कमालीच्या आपुलकीने आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. घरगुती गणपती, गावाबाहेर असलेले कोकण वासीयांची लगबग, शेतीशी जोडलेला 'नवं सोहळा', पारंपरिक भजन आणि दशावतारी नाट्यप्रयोग यामुळे या गावांतील गणेशोत्सवाला वेगळे सांस्कृतिक वैशिष्ट्य लाभले आहे.

### गजबजतात जुनी घरे

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांपेक्षा घरगुती गणपतींना गावांत अधिक महत्त्व दिले जाते. मुंबई, पुणे आणि गोवा येथून हजारो कोकणवासी आवर्जून गावी दाखल होतात. वर्षभर बंद असलेली जुनी कौटुंबिक घरे गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुन्हा उघडली जातात. घरांची डागडुजी, साफसफाई आणि सजावट केली जाते. एकाच घरात संपूर्ण विस्तारित कुटुंब एकत्र येते आणि भक्तिभावाचे दर्शन होते.

### शेती संस्कृतीचे दर्शन

यागावांतीलगणेशोत्सवाचाशेतीसंस्कृतीशी अतूट संबंध आहे. गणेशोत्सवाच्या काळात गावच्या परंपरेनुसार 'नवं सोहळा' साजरा केला जातो. शेतातील कोवळ्या भाताच्या लोंब्या प्रथम गणरायाच्या चरणी अर्पण केल्या जातात. त्यानंतर नव्या तांदळापासून तयार केलेल्या खिरीचा नैवेद्य बाप्पाला दाखविला जातो.त्यानंतरच घरातील सर्वजण एकत्र जेवण करतात.

### 'गणेशघाटावर भावूक निरोप

सरंबळ येथील कर्ली नदीच्या पात्रात असलेल्या देऊळवाडी गणेशघाटावर गावातील बहुतांश गणपतींचे विसर्जन केले जाते. विसर्जनाच्या दिवशी संपूर्ण गाव या ऐतिहासिक घाटावर एकत्र येते. नदीच्या विस्तीर्ण पात्रात भक्तिभावाने बाप्पाला निरोप देताना निर्माण होणारे वातावरण आणि घाटावरील गर्दीचे विहंगम दृश्य पाहण्यासारखे असते.

### भजनाच्या सुरांत रंगतो रात्रीचा उत्सव

गणरायाच्या आगमनानंतर गावात दररोज रात्री आबालवृद्ध एकत्र येतात. स्थानिक भजनी मंडळे पारंपरिक झांज आणि पखवाजाच्या साथीने भक्तिगीते आणि अभंग सादर करतात. ढोल-ताशांचा गजर न करता केवळ भजनाच्या सुरांनी रात्रीचे वातावरण भक्तिमय आणि मंत्रमुग्ध होते. गावातील मंदिर परिसरात दशावतारी नाटकांचे आयोजन केले जाते. ही कलासेवा बाप्पाच्या चरणी अर्पण करण्याची येथील परंपरा असून, धार्मिक श्रद्धेसोबतच कोकणच्या लोककलेचेही दर्शन या माध्यमातून घडते.

### रानफुलांनी सजते बाप्पाची माटवी

गणेशोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नैसर्गिक आणि पर्यावरणपूरक सजावट. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेली रानफुले, विड्याची पाने, काजूची फळे आणि केळीच्या खांबांचा वापर करून बाप्पाची सुंदर माटवी सजविली जाते. कुटुंबाला एकत्र आणणारा उत्सव, शेती संस्कृतीशी जोडलेली परंपरा, लोककलेची सेवा आणि निसर्गाशी नाते सांगणाऱ्या वैशिष्ट्यांमुळे सोनवडे आणि सरंबळचा गणेशोत्सव कोकणच्या अस्सल सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवतो.

# नव्या धान्याचा पहिला मान गणरायाला!

सिंधुदुर्गातील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या अनेक ग्रामीण भागांत गणेशोत्सवाच्या काळात शेतीशी जोडलेली एक सुंदर आणि प्राचीन परंपरा आजही श्रद्धेने जपली जाते. 'नवं सोहळा' किंवा 'नवान्न सोहळा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या परंपरेत शेतात तयार झालेल्या नव्या धान्याचा पहिला मान देवाला दिला जातो. निसर्गाने दिलेल्या नवीन अन्नाचा पहिला घास स्वत: घेण्यापूर्वी तो देवाच्या चरणी अर्पण करण्याची ही प्रथा आहे.

### 'नवं सोहळा' म्हणजे काय?

कोकणात पावसाळ्यात प्रामुख्याने भातशेती केली जाते. गणेशोत्सवाच्या काळात सुरुवातीच्या भातपिकाला कोवळ्या लोंब्या येऊ लागतात. या नव्या धान्याला 'नवान्न' म्हटले जाते. नव्या पिकाचे स्वागत करून त्यातील पहिला वाटा गणरायाच्या चरणी अर्पण करण्याच्या परंपरेला 'नवं सोहळा' असे म्हटले जाते. ही केवळ धार्मिक परंपरा नसून शेतकरी आणि निसर्ग यांच्यातील ऋणानुबंध व्यक्त करणारा कृषीसंस्कृतीचा सोहळा आहे.



### शेतातून वाजतगाजत घरी येते 'नवं'

या सोहळ्यासाठी कुटुंबातील पुरुष किंवा शेतकरी सकाळी लवकर उठून स्नान करतात आणि पारंपरिक वेशात शेताकडे जातात. शेताची पूजा केल्यानंतर नवीन भाताच्या काही लोंब्या श्रद्धेने कापल्या जातात. या लोंब्या वाजतगाजत घरी आणण्याचीही काही ठिकाणी प्रथा आहे. घरी आणलेल्या भाताच्या लोंब्यांसोबत आंब्याची पाने, सुवासिक फुले आणि कुर्डूची फुलेङङ एकत्र बांधून तोरण तयार केले जाते. हे तोरण घराच्या मुख्य दरवाजासह गोठा आणि धान्याच्या कोठाराला म्हणजेच कणगीलाही बांधले जाते.

### नव्या तांदळाची पहिली 'खीर' बाप्पाला

नव्या धान्यापासून घरात पहिली 'खीर' तयार केली जाते.

गणपती बाप्पा आणि गौरीमातेच्या चरणी नवीन भाताच्या लोंब्यांसह या खिरीचा नैवेद्य दाखविला जातो. देवाला नैवेद्य अर्पण केल्यानंतरच कुटुंबीय नव्या धान्याचा आस्वाद घेतात.

काही भागांत कोवळ्या तांदळाचे दाणे खलबत्त्यात कुटून त्यापासून 'नवे दूध' तयार केले जाते. दूध, गूळ आणि नवीन तांदळाचे पोहे यांचा वापर करून हा प्रसाद तयार केला जातो. घरातील ज्येष्ठ व्यक्ती परिवारातील सदस्यांच्या हातावर हे पवित्र दूध प्रसाद म्हणून देतात.

### नवान्नाच्या दिवशी मांसाहार वर्ज्य

'नवं'च्या दिवशी घरात मांसाहार पूर्णपणे वर्ज्य ठेवण्याची प्रथा काही ठिकाणी आहे. गावातील किंवा नात्यातील मंडळी एकत्र येऊन नव्या धान्याचा आस्वाद घेतात. त्यामुळे हा सोहळा कुटुंबीय आणि ग्रामस्थांना एकत्र आणणारा स्नेहसोहळाही ठरतो.

### काही गावांत संपूर्ण गावासाठी एकच 'नवं'

सिंधुदुर्गातील सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या काही ग्रामीण भागांत 'नवं' प्रत्येक कुटुंब स्वतंत्रपणे साजरे न करता संपूर्णगावएकत्रयेऊनङङसाजरे करण्याची परंपराही आहे. गावची ग्रामदेवता किंवा ग्रामदैवताच्या मंदिरात नवीन भाताच्या लोंब्या आणल्या जातात. मंदिरात विधिवत पूजा झाल्यानंतरच गावात नवान्न शिजविले जाते. अशा पद्धतीने गणेशोत्सव, शेती आणि ग्रामदैवताची श्रद्धा यांचा सुंदर संगम या परंपरेतून घडतो. निसर्गाने दिलेल्या नव्या धान्याचा पहिला मान देवाला आणि त्यानंतरच साधी, पण अर्थपूर्ण भावना जपणारा 'नवं सोहळा' आजही कोकणच्या कृषीसंस्कृतीचे जिवंत प्रतीक आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र डिजिटल स्वरूपात वाचकांसाठी उपलब्ध आहे. धुरी एक्सप्रेस ही संस्था या वृत्तपत्राची मालक आहे. धुरी एक्सप्रेस डॉट कॉम या संकेतस्थळावर वृत्तपत्र प्रकाशित केले आहे. या डिजिटल अंकाचे सर्व हक्क प्रकाशक संस्थेकडे सुरक्षित आहेत. या अंकाची विक्री करणे किंवा अनधिकृत व्यावसायिक वापर करणे कायदेशीर गुन्हा आहे. संपादक : धुरी एक्सप्रेस.
संपर्क : https://dhuriexpress.com/ : ईमेल : dhuriexpress123@gmail.com, https://www.youtube.com/@dhuriexpress123, https://www.facebook.com/dhuriexpress123, https://x.com/dhuriexpress123, https://t.me/dhuriexpress123, https://www.instagram.com/dhuriexpress